# अर्ज करण्याची पद्धत

## शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरणेसाठी - प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थी

१. स्वतःचा कायमस्वरूपी मोबाईल नंबर स्वतःच्या आधार नंबरशी लिंक करण्यात यावा.
२. स्वतःच्या नावे राष्ट्रीयकृत / शेड्यूल्ड बँकेमध्ये खाते उघडण्यात यावे.
३. स्वतःचा आधार नंबर स्वतःच्या बँक खातेशी लिंक करण्यात यावा.
४. शिष्यवृत्तीच्या संकेतस्थळावरती User ID व Password तयार करून घेणे.
५. प्रथम Profile update करावे. Profile update करतेवेळी सुचनांचे पालन करून अर्ज भरावा.
६. Profile 100% update केलेनंतर लागू असणारी Scheme Apply करावी.

## शिष्यवृत्तीचे अर्ज Renewal करणेसाठी – द्वितीय ते अंतिम वर्षातील विद्यार्थी

७. मागील वर्षाचा User ID व Password वापरून Login करावे.
८. वरील अ. क्र. ५ व ६ प्रमाणे कार्यवाही करावी.

# शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शक सुचना

१. नवीन शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयाने प्रसिद्ध केलेल्या नोटीसीप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून आवश्यक तेथे मूळ कागदपत्रे अथवा झेरॉक्स प्रती साक्षांकित करून एका प्रतीत महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये जमा करावे.

२. मागासवर्गीय शिष्यवृत्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, राज्य शासन अल्प संख्यांक शिष्यवृत्ती योजनासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाचे आहेत.

३. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्तीसाठी मॅन्यूअल पद्धतीने अर्ज भरावयाचे आहेत.

४. ज्या शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाचे असतात त्या योजनांसाठी संकेतस्थळावर दिलेल्या अंतिम मुदतीच्या आत विद्यार्थ्यांनी त्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे बंधनकारक आहे. जर एकाद्या विद्यार्थ्यांन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरला नाही तर त्याला शासनाकडून शुल्क माफीसाठी कोणताही आर्थिक लाभ मिळणार नाही.

५. शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ७५ टक्के असणे बंधनकारक आहे.

६. शिष्यवृत्ती मंजूरीसाठी विद्यार्थ्यांने शैक्षणिक वर्षातील दोन्ही सत्राची परीक्षा देणे आवश्यक आहे.

७. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनापैकी कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.

८. शासनाकडून वेळोवेळी निर्गमीत होणारे निर्णय / परिपत्रकानुसार शिष्यवृत्तीच्या नियम व अटीमध्ये बदल होऊ शकतो, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.